# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.01.2025** **वार:मंगळवार**

---

1. एचएमपीव्ही विषाणूसंसर्गाच्या परिणामी श्वसन विकारांत वाढ झाल्यास ते हाताळण्यास देशातली आरोग्य यंत्रणा सक्षम- आरोग्य मंत्रालयाची ग्वाही
2. केंद्रीय अन्वेषण विभागानं विकसित केलेल्या भारतपोल पोर्टलचा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार प्रारंभ
3. केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत केंद्रीय अर्थमंत्र्यांची तज्ज्ञांशी सल्लामसलत पूर्ण
4. छत्तीसगडमध्ये माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा राष्ट्रपतीकडून तीव्र निषेध आणि
5. दिल्ली, नोएडासह देशाच्या उत्तर भागात आणि नेपाळमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के

**<u>एचएमपीव्ही</u>**

देशात एचएमपीव्ही विषाणूसंसर्गाचे तमिळनाडू आणि कर्नाटकात प्रत्येकी दोन रुग्ण आढळले आहेत. कर्नाटकात तीन आणि आठ महिन्यांच्या दोन बाळांना हा संसर्ग झाला असून दोघांचीही प्रकृती सुधारत आहे तसंच त्यांनी मागच्या काही दिवसांत परदेश प्रवास केलेला नाही, असं आरोग्य मंत्रालयानं सांगितलं आहे. तमिळनाडूमधील रुग्णांची स्थितीही सुधारत असल्याचं आरोग्य विभागानं स्पष्ट केलं आहे. हा विषाणू नवा नाही, 2001 मध्ये याचा शोध लागलेला आहे. तसंच याचा संसर्ग रोखणं शक्य आहे, त्यामुळं घाबरून जाण्याचे कारण नाही. फ्लूसदृश किंवा श्वसनाच्या गंभीर आजाराच्या रुग्णसंख्येत देशात कोणतीही अनियमित वाढ झालेली नाही, तसंच श्वसन विकारांत वाढ झाल्यास ते हाताळण्यास देशातली आरोग्य यंत्रणा सक्षम आहे आणि गरज भासल्यास जास्तीची आरोग्य यंत्रणा त्वरित तैनात केली जाऊ शकते असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. या विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी मास्क वापरणं, हात वारंवार धुणे आणि काही लक्षणं जाणवल्यास वेळीच वैद्यकीय तज्ज्ञांशी संपर्क साधणं आवश्यक आहे, अशा सूचना आरोग्य मंत्रालयानं दिल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. आरोग्य विभागाच्या सूचनांचं पालन करावं आणि स्वत:ची काळजी घ्यावी, असं आवाहन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे.

**<u>पंतप्रधान-नाडेला</u>**

मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. मायक्रोसॉफ्ट भारतात करणार असलेल्या गुंतवणुकीबाबत आणि विस्ताराबाबत पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं आहे. नाडेला यांच्याबरोबर तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आदी विषयांवर चर्चा झाल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-सुलिव्हान</u>**

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. गेल्या चार वर्षांतील भारत-अमेरिकेदरम्यानच्या जागतिक धोरणात्मक भागीदारीतील महत्त्वपूर्ण प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. विशेषत: तंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ, नागरी आण्विक, स्वच्छ ऊर्जा, सेमीकंडक्टर आणि एआय या प्रमुख क्षेत्रांवर यावेळी भर देण्यात आला. अमेरिकेचे माजी अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्यासोबत झालेल्या त्यांच्या विविध भेटींचे स्मरण करून, पंतप्रधान मोदी यांनी भारत-

अमेरिका व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी बायडेन यांच्या योगदानाचं कौतुक केलं. दोन्ही देशांच्या लोकांच्या हितासाठी आणि जागतिक हितासाठी दोन्ही लोकशाही देशांमधील घनिष्ठ सहकार्य वाढवण्याच्या आपल्या वचनबद्धतेला पंतप्रधान मोदी यांनी दुजोरा दिला.

**भारतपोल**

केंद्रीय अन्वेषण विभागानं विकसित केलेल्या भारतपोल पोर्टलचा प्रारंभ केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहाय्यासाठी येणाऱ्या सर्व विनंत्यांची इंटरपोलद्वारे प्रक्रिया सुविहित करण्याचं काम भारतपोल पोर्टल च्या माध्यमातून करण्यात येईल. त्यामध्ये रेड नोटिस जारी करण्यासह इतर नोटिसांचा समावेश आहे. सर्वांसाठी सुरक्षित भारत निर्माण करण्याच्या मोदी सरकारच्या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी या पोर्टलमुळे भारतीय तपास यंत्रणांना जगभरात जागतिक पोहोच वाढवता येणार असल्यानं त्यांना अधिक परिणामकारकपणे काम करता येईल असं अमित शहा यांनी समाजमाध्यमावरील एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**अर्थसंकल्प**

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली विविध क्षेत्रातील तज्ज्ञांशी, प्रतिनिधींशी सुरू असलेली अर्थसंकल्पपूर्व सल्लामसलत काल पूर्ण झाली. गेल्या वर्षी सहा डिसेंबरपासून ही सल्लामसलतींच्या फेऱ्या सुरू होत्या. शेतकरी संघटना आणि कृषी अर्थतज्ज्ञ, कामगार संघटना, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र, एमएसएमई, व्यापार आणि सेवा, उद्योग, अर्थतज्ज्ञ, वित्तीय क्षेत्र आणि भांडवली बाजार अशा नऊ गटांमधील शंभरहून अधिक निमंत्रितांनी या चर्चेत भाग घेतला. त्यांच्या मौल्यवान सूचनांबद्दल अर्थमंत्र्यांनी आभार व्यक्त केले. केंद्रीय अर्थसंकल्प तयार करताना त्यांच्या सूचनांचा काळजीपूर्वक विचार केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिलं. दरम्यान, दहा जानेवारीपासून, सर्वसामान्य नागरिकांना माय जीओव्ही या प्लॅटफॉर्मवर केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत सूचना पाठवता येणार आहेत.

**स्पॅडेक्स लांबणीवर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोच्या स्पॅडेक्स मोहिमेचा म्हणजे अंतराळात दोन उपग्रह एकमेकांना जोडण्याचा प्रयोग लांबणीवर टाकण्यात आला आहे. त्यामुळे आज सकाळी नियोजित असणारा हा प्रयोग आता दोन दिवसांनी म्हणजे 9 तारखेला होणार आहे. इस्रोनं समाजमाध्यमावरून ही माहिती दिली आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे डॉकिंग प्रक्रियेला ग्राउंड सिम्युलेशनद्वारे आणखी प्रमाणीकरण आवश्यक आहे. या कारणामुळे डॉकिंगचा प्रयोग आता आता 9 जानेवारीला करण्यात येणार आहे.

**नक्षलवादी हल्ला**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा राष्ट्रपती द्रौपदी मुरमू यांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे. माओवाद्यांनी केलेल्या या आयइडी स्फोटात 9 जणांचा मृत्यू झाला; यामध्ये 8 सुरक्षा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. दोन दिवसांपूर्वी छत्तीसगडमध्ये तीन जिल्ह्यांत शोधमोहीम राबवून सुरक्षा यंत्रणांनी पाच माओवाद्यांना ठार केलं होतं. ही कारवाई संपवून सुरक्षा कर्मचारी आपल्या तळावर परतत असताना माओवाद्यांनी स्फोट घडवून त्यांचं वाहन उडवलं. यात वाहनातल्या आठ जवानांसह वाहनचालकाचा मृत्यू झाला.

**अमेरिका-ट्रम्प**

अमेरिकेतील वॉशिंग्टनमधील प्रतिनिधी आणि सिनेटच्या संयुक्त अधिवेशनात काल रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प नोव्हेंबरमधील निवडणुकीत बहुमतानं विजयी झाल्याचं घोषित करण्यात आलं. 50 राज्ये आणि डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबियामधील निवडणूक निकालांचे प्रमाणीकरण काल करण्यात आलं. ट्रम्प यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस यांच्यावर विजय मिळवला असून, आता ते 20 जानेवारी रोजी पदाची शपथ घेतील, असंही यावेळी जाहीर करण्यात आलं.

**कॅनडा पंतप्रधान राजीनामा**

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी सत्ताधारी लिबरल पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला आहे. संध्याकाळी ओटावा इथं एका पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली. सर्वतोपरी प्रयत्न करूनही अनेक महिने संसद ठप्प राहिल्यानं हा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी नमूद केलं. जोपर्यंत नव्या नेत्याची निवड होत नाही तोपर्यंत ते पंतप्रधानपदी काम करत राहतील असंही ट्रुडो यांनी सांगितलं. लिबरल पक्षाच्या नेतेपदी 11 वर्षं आणि नऊ वर्षं पंतप्रधान म्हणून कार्यरत असलेल्या ट्रुडो यांना त्यांच्याच पक्षाच्या सदस्यांकडून बंडखोरीचा सामना करावा लागला असून, त्यांच्या धोरणांमुळे त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली आहे.

**मध्यप्रदेश-विज्ञान कॉंग्रेस**

मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये काल 31 व्या राष्ट्रीय बाल विज्ञान काँग्रेसचा समारोप झाला. चार दिवस झालेल्या या कार्यक्रमात 640 विद्यार्थ्यांनी भाग घेतला, आणि 194 प्रकल्प सादर करण्यात आले. हा कार्यक्रम बाल वैज्ञानिकांसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे, त्यांच्या कल्पनाशक्तीला आणि नवनिर्मितीला इथं नवी दिशा मिळते. भविष्यातील शास्त्रज्ञ तयार करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा टप्पा आहे, असे मॅपकॉस्टचे महासंचालक डॉ. अनिल कोठारी यांनी सांगितलं.

**टेबल टेनिस-दोहा**

जागतिक टेबल टेनिस स्टार 2025 स्पर्धेची सुरुवात काल कतारमधील दोहा इथं झाली. पुरुष एकेरी पात्रता फेरीमध्ये, भारताच्या अनिर्बन घोषने इराणच्या नवी शम्सचा 3-2 असा पराभव केला, स्नेहित सुरवज्जुलानं पायस जैनचा 3-1 असा, तर मानुष शाह यानं फ्रान्सच्या फ्लोरियन बोरासॉडचा 3-1 असा पराभव केला. महिला एकेरीत भारताच्या पोयमंती बैस्या हिला तैपेईच्या हुआंग यू-जीकडून 1-3 नं पराभव पत्करावा लागला. स्पर्धेमध्ये 12 सदस्यांचा भारतीय संघ सहभागी होत असून यात मनिका बत्रा, श्रीजा अकुला, अहिका मुखर्जी, सुतीर्थ मुखर्जी, मानव ठक्कर आणि शरथ कमल यांचा समावेश आहे.

**भूकंप**

देशात बिहार, दिल्ली नोएडा, आणि सिक्कीमच्या काही भागात तसंच नेपाळमध्ये आज भूकंपाचे जोरदार धक्के बसल्याचं वृत्त नुकतंच हाती आलं आहे. सकाळी सहा वाजून 40 मिनिटांनी हा भूकंप जाणवला. नेपाळमधील लोबुचे पासून 93 किलोमीटर अंतरावर ईशान्येकडे या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. नेपाळमध्ये या भूकंपाची 7 पूर्णांक 1 रिखटर एवढी तीव्रता नोंदवली गेली. याबाबत अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार